# <u>प्रेसनोट</u>

दि. २८/०४/२०२५

**अ‍ॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून ग्रामपंचायत भांबर्डे, ता. शिरुर, जि. पुणे येथील ग्रामपंचायत अधिकारी यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | रांजनगांव एमआयडीसी पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३७ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्रीमती. निर्मला कैलास भुजबळ, वय ४४ वर्ष, पद – ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत - भाबर्डे, ता. शिरुर, जि. पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६०,०००/- (साठ हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम | ६०,०००/- (साठ हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ६०,०००/- (साठ हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | दि.१/०४/२०२५, दि. ३/०४/२०२५ व दि. १५/०४/२०२५ |
| सापळा दिनांक | २८/०४/२०२५ रोजी |
| ठिकाण | भांबर्डे ग्रामपंचायत कार्यालय, ता. शिरुर, जि. पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. विरनाथ माने, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ८४८५००५०२०) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी सन २०२० - २०२१ मध्ये ग्रामपंचायत भांबर्डे येथे पेवर ब्लॉक बसवले असून, त्या कामाच्या बिलाचा मोबदला तसेच त्यांनी ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडीचे केलेल्या बांधकामातील उर्वरित बिलाचे चेक काढण्याचा मोबदला म्हणून लोकसेवक श्रीमती निर्मला भुजबळ यांनी तक्रारदाराकडे एकुण बिलाच्या सहा टक्के अथवा ६०,००० रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार दि. २७/०३/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. १/०४/२०२५, दि. ३/०४/२०२५ व दि. १५/०४/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक श्रीमती निर्मला भुजबळ यांनी वरील नमुद कामासाठी तक्रारदाराकडे एकुण बिलाच्या सहा टक्के अथवा ६०,००० रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज दि. २८/०४/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्रीमती निर्मला भुजबळ यांनी तक्रारदाराकडून ग्रामपंचायत भांबर्डे येथे पेवर ब्लॉक बसवलेल्या कामाच्या बिलाचा मोबदला म्हणुन १०,००० रुपये तसेच ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडी बांधकामातील उर्वरित बिलाचे चेक काढण्याचा मोबदला म्हणून ५०,००० रुपये असे एकुण ६०,००० (साठ हजार) रुपये लाच रक्कम ग्रामपंचायत कार्यालय भांबर्डे येथे पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचे विरुद्ध रांजणगांव एमआयडीसी पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.